महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १४१ वे | दिनांक : १६/०५/२०२६ | वार : शनिवार

## निवडणुकांचा 'सेल' संपला, आता खिसा कापणीचा 'महासेल' सुरू



**मुंबई :** आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे केंद्राने पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत प्रति लिटर प्रत्येकी 3 रुपयांची वाढ केली आहे. यामुळे अगोदरच महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या सर्वसामान्यांना मोठा झटका बसला आहे. विरोधकांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत केंद्राने या दरवाढीच्या माध्यमातून महागाईच्या भडक्यात घासलेट टाकल्याची टीका केली आहे.

पेट्रोल आणि डिझेल प्रति लिटर 3-3 रुपयांनी महाग झाले आहे. दिल्लीत आता पेट्रोल 97.77 रुपये प्रति लिटरने मिळेल. डिझेलची किंमत 90.67 रुपये प्रति लिटर झाली आहे. नवीन दर आज 15 मे पासून लागू झाले आहेत. सुमारे 2 वर्षांनंतर दरांमध्ये ही वाढ करण्यात आली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणी सरकारवर महागाईच्या भडक्यात घासलेट अर्थात रॉकेल ओतल्याची टीका केली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणी सरकारच्या कामकाजाचे वाभाडे काढलेत. ते म्हणाले, कॉम्प्रोमाईज इलेक्शन कमिशनच्या आशीर्वादाने सरकार स्थापन झालं ते देशाला महागाई आणि आर्थिक संकटापासून सुरक्षित ठेवण्यासाठी; सत्तेत येऊन इतर देशांतील दरांशी तुलना करून स्वतःचं अपयश झाकण्यासाठी नाही! सरकारचं काम राज्यकारभार चालवणं, हास्यास्पद तुलना करणे नाही.

2014 पूर्वी तुलना व्हायची ती विकासाची. आपल्यापेक्षा पुढे असलेल्या देशांपासून, प्रेरणा घेण्यासाठी. ती तुलना नेहमीच प्रोत्साहन देणारी होती. आज तुलना होते, इंधन दरांची, कायदा-सुव्यवस्थेच्या बोजवाऱ्याची, प्रशासनाच्या अपयशाची. आणि अशा देशांशी ज्यांचा भारतासोबत कधी उल्लेखही केला जात नव्हता. हीच खरी अधोगती आहे, असे ते म्हणालेत. काँग्रेस नेते सतेज पाटील यांनीही या प्रकरणी सरकारवर तोंडसुख घेतले आहे. राष्ट्रप्रेमाखातीर त्यागाची पहिली पावती 3 रुपयांची. निवडणुकांपर्यंत “सब चंगा सी” होतं. निवडणुकांच्या प्रचारात वास्तविक प्रश्नांऐवजी देव, देश आणि धर्म धोक्यात आणून जनतेच्या भावनांना हात घालण्यात आला. लोकांनी मतदान केलं, निवडणुका संपल्या आणि आता जनतेचं राष्ट्रप्रेमासाठी “त्याग करावा” असा हट्ट! त्या राष्ट्रप्रेमासाठी त्यागाची पहिली पावती म्हणजे पेट्रोल आणि डीझेलवर 3 रुपयांची दरवाढ! जनतेने अजून किती सोसायचं? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला आहे. आखाती देशांमधील युद्ध फेब्रुवारी महिन्यापासून सुरू आहे. काँग्रेसचे नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी महागाईच्या संकटाबाबत तेव्हाच सरकारला सावध केले होते. मात्र, केवळ निवडणुका जिंकण्यासाठी सरकारने वेळीच उपायोजना करण्याचे टाळले. जनतेला तब्बल 3 महिने मूर्ख बनवले. आता निवडणुका संपताच मोदी सरकारने देशावर महागाईचे संकट लादले आहे. CNG, व्यावसायिक गॅस, पेट्रोल, डिझेल, दूध अशी प्रत्येक जीवनावश्यक वस्तू आता महाग झाली आहे.

केवळ निवडणुका जिंकण्याच्या हट्टापायी मोदी सरकारने संपूर्ण देशाला महागाईच्या दरीत ढकलले आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनीही या प्रकरणी सरकारवर निशाणा साधला आहे. निवडणुकांचा 'सेल' संपलाय, आता खिसा कापणीचा 'महासेल' सुरू झालाय! निवडणुका संपेपर्यंत जे 'दरबॉम्ब' खिशात लपवून ठेवले होते, ते आता थेट जनतेच्या खिशावर पडू लागलेत. पंपावर रांगा लागल्यात आणि सरकारचं रेकॉर्ड मात्र तेच जुनं वाजतंय - "टंचाई कुठेही नाही!" लोक पंपावर पेट्रोल घ्यायला उभे आहेत, तर 'महागाईचा महोत्सव' साजरा करण्यासाठी नाही, असे ते म्हणालेत.रोहित पवार म्हणाले, डॉ. मनमोहन सिंग साहेबांच्या UPA सरकारच्या काळात कच्च्या तेलाचे दर 110 डॉलर प्रती बॅरल असतानाही तत्कालीन केंद्र सरकारने पेट्रोल-डिझलचे दर 60 रुपयांच्या आसपास स्थिर ठेवून जनतेला महागाईची झळ लागू दिली नाही. पण 2014 नंतर भाजप सरकार आल्यापासून कच्च्या तेलाचे दर 110 डॉलर प्रती बॅरलवरुन सरासरी 60 डॉलर प्रती बॅरलपर्यंत खाली आले असतानाही देशांतर्गत पेट्रोल-डिझेलचे दर 60 रुपयांवरुन निम्म्याने कमी करण्याऐवजी उलट करांमध्ये 9 रुपयांवरुन 32 रुपये वाढ करुन केंद्र सरकारने ते 90 रुपये प्रती लिटरच्या आसपास नेऊन ठेवले आणि सामान्य जनतेच्या खिशावर अक्षरशः 10 लाख कोटी रुपयांचा डल्ला मारला.

आज युद्धजन्य परिस्थितीत कच्च्या तेलाचे दर वाढताच 5 राज्यातील निवडणूक होईपर्यंत जीव मुठीत धरून ठेवलेल्या केंद्र सरकारने निवडणुकीचा स्वार्थ साधताच पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ करुन नफेखोरी हाच आमचा धंदा असून जनतेशी काहीही देणंघेणं नाही, हेच दाखवून दिलं. ही दरवाढ भाजपच्या अंध भक्तांसाठी देशभक्ती असली तरी सामान्य माणसासाठी महागाईच्या भडक्यात टाकलेलं घासलेट आहे. देशवासीयांनो आता आवाज उठवायचा नसेल तर आपल्या हातात एकच गोष्ट शिल्लक आहे. निमूटपणे सहन करणं. पण मला अजूनही आशा आहे की, सरकारकडूनच जनतेची अशी लूट होत असताना सर्वजण व्यक्त होतील आणि आपला रोष दाखवून देतील, असे ते म्हणाले.

शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनीही या प्रकरणी सरकारवर टीका केली आहे. निवडणुका संपल्या... त्यामुळे आता मोदी सरकारची वसुली सुरू. पेट्रोल आणि डिझेलचे दर 3-3 रुपयांनी वाढवले तर CNG च्या दरातही 2 रुपयांची वाढ करण्यात आली. हा प्रश्न फक्त पेट्रोल-डिझेलच्या 3 रुपयांच्या दरवाढीचा नाही, तर सतत वाढणाऱ्या महागाईच्या वाढत्या ओझ्याचा आहे. सद्या परिस्थिती अशी आहे की, एकीकडे जनतेचे खिसे रिकामे होत आहेत, तर दुसरीकडे भाषणांमधील ‘अच्छे दिन’ मात्र अजूनही सुरूच आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

## मनोज जरांगेंचा पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा



**जालना :** मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. मुंबईच्या आंदोलनावेळी मराठा आरक्षणाचा सातारा गॅझेटचा जीआर एका महिन्यात काढतो असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्यावर आठ महीने जाले तरी काहीही कारवाई करण्यात आली नाही. मराठा आंदोलकांवरील गुन्हेही मागे घेतले गेले नाहीत, अशा शब्दात जरांगे यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

मनोज जरांगे जालन्यात बोलताना म्हणाले, ज्यांना कुणबी पुरावा सापडला त्यांना व्हॅलिडिटी दिली जात नाही. शिंदे समिती रेकॉर्ड शोधत नाही. देवेंद्र फडणवीसांनी मराठ्यांचे वाटोळे केले, अशी टीका जरांगे यांनी केली आहे. त्यामुळे आता मराठा आरक्षणाच्या मागणीवरून पुन्हा एकदा आंदोलनाची चिन्हे स्पष्ट दिसू लागली आहेत. जरांगे पुढे बोलताना म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मराठा समाजाला जास्तीत जास्त त्रास देण्याचे काम सुरू आहे. मते आणि नेते मराठ्यांची लागतात, पण मराठा समाजातील मुले मोठी होऊ नयेत, अशी भूमिका दिसते, अशीही टीका त्यांनी केली आहे.

मुंबई आंदोलनानंतर हैदराबाद गॅझेटचा जीआर निघाला त्यावेळी सरकारचे कौतुक केले होते. त्यानंतर 108 प्रमाणपत्रांचे वितरण जाले. मात्र सातारा संस्थानाच्या गॅझेटबाबत दिलेले आश्वासन अजूनही पूर्ण झालेले नाही. आता आम्हीच पाहतो हा जीआर कसा निघत नाही, असा थेट इशाराच जरांगे यांनी दिला आहे. तसेच कुणबी नोंदी सापडूनही संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने अनेक मराठा कुटुंबे अडचणीत आहेत. शिंदे समिती रेकॉर्ड शोधण्याच्या प्रक्रियेत अपेक्षित गती नसल्याने समाजात नाराजी वाढत असल्याचेही जरांगे यांनी नमूद केले.

मराठा समाजाला न्याय मिळेपर्यंत मागे हटणार नाही. आंदोलनाची पुढील तारीख शनिवारी जाहीर केली जाईल, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. आमची लेकरंही आम्हाला सोन्यासारखी आहेत. सरकारने आणखी बळी घेऊ नये, असे आवाहनही जरांगे यांनी केले आहे.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
• महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
• सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
• शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
• हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १६ मे २०२६


## सामान्य कुटुंबातील मुलगा शिकायचा असेल तर जिल्हा परिषदेच्या शाळा वाचवा




**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** सामान्य कुटुंबातील मुलगा शिकायचा असेल तर जिल्हा परिषदेच्या शाळा वाचवा. पोरांनो, मोर्चे, आंदोलन व दंगलीच्या भानगडींमध्ये पडू नका. आज प्रत्येक कामामध्ये पोलीस पडताळणी आवश्यक आहे. अशा दंगलीमध्ये तुम्ही दिसलात तर १० वर्षांची शिक्षा होईल. मुलांसह युवक मोबाईलच्या व्यसनात अडकले आहेत. शाळेतील पोरं रम्मी खेळून भिकारी झाली आहेत. संभाजी महाराजाची जयंती म्हणून शाळेत शैक्षणिक कालावधीत शिक्षकांसह विद्यार्थ्यांचे मोबाईल बंद ठेवण्याचा निर्णय प्रत्येक गावाने घेतला तरच शाळा सुधारेल असे मत हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांनी व्यक्त केले.धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त व अधिकमास निमित्ताने शरण पाटील फाऊंडेशनच्या वतीने तालुक्यातील दाळींब येथे बुधवारी (दि.१३) समाज प्रबोधनकार, महाराष्ट्रभूषण ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांची किर्तन सेवा आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यासपिठावर मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता समितीचे विधानसभा सह-अध्यक्ष शरण बसवराज पाटील, जिप सदस्य रफिक तांबोळी, योगेश राठोड, अमर वाले, नगरसेवक राजु मुल्ला, सादिक चाकुरे आदी उपस्थित होते. किर्तणसेवेत पुढे हभप इंदोरीकर म्हणाले की, चुकीच्या मार्गाने पैसा, सोने, गाड्या, संपत्ती कमवाल पण त्यामध्ये जीवनातील समाधान मिळणार नाही. बाप स्वतःच्या पायात चप्पल न चालता, फाटके बनीयन वापरतो, डोक्याला व भाजीला तेल नसले तरी मुलांच्या शिक्षणासाठी आई अहोरात्र काबाडकष्ट करते. आई वडिलांची व संतांची सेवा केली तरच देव भेटतो. शेतकऱ्यांनी पुरक उद्योग करणे गरजेचे आहे. महिला वेळेवर जेवण करत नसल्याने त्यांच्यात आजाराचे प्रमाण वाढले आहे. दारुडयाला मुलगी देणे म्हणजे कसायाला गाय देण्यासारख आहे. निर्व्यसनी मुलगा हीच खरी संपत्ती आहे. जो शेती करतो त्यांनाच शेतकऱ्यांबद्दल बोलण्याचा अधिकार आहे. शरीरात प्राण आहे तोपर्यंत सर्व सुख समाधानी रहा. असलेल्या साधन संपत्तीचा जीवनात उपभोग कधी घेणार आहात ? माणवाच्या अंगातील ताकत आणि खिशातला पैसा संपला की समाजातील किंमत संपली. फक्त किर्तण ऐकुन उपयोग नाही किर्तणामुळे समाजात बदल होण गरजेच आहे. ज्ञान आले की दुःख येत नाही.

चुकीचे निर्णय दुःखाला कारणीभूत आहे. दोन मिनिटांच्या रागातील कर्माचे फळ आयुष्यभर भोगावे लागते. लहान बाळाला मोबाईल देऊन आई-वडिलांनी बिघडवले आहे. प्रत्येकाने किमान ५ तास मोबाईल पासुन दुर रहाण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## जिंतूरमध्ये गांजा विक्रीवर पोलिसांची धाड; सव्वा सहा लाखांचा मुद्देमाल जप्त



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मोकळ्या मैदानात उभ्या असलेल्या वाहनातून अवैधपणे गांजाची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी (दि.१४ मे) सायंकाळी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत १ किलो १९० ग्रॅम गांजासह महिंद्रा TUV वाहन असा एकूण ६ लाख २९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अभिजीत उर्फ बिल्ली सुभाष राठोड (रा. गणपती गल्ली, जिंतूर) हा त्याच्या ताब्यातील महिंद्रा कंपनीच्या MH 46 AU 2229 क्रमांकाच्या करड्या रंगाच्या TUV जीपमधून गांजाची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्हा परिषद शाळेच्या मैदान परिसरात सापळा रचून छापा टाकला.दरम्यान पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने वाहन घटनास्थळी सोडून पळ काढला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला, मात्र तो अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. त्यानंतर महसूल राजपत्रित अधिकारी श्री. गायकवाड, सपोनि विजय जाधव व शासकीय पंचांच्या उपस्थितीत वाहनाची झडती घेण्यात आली.या झडतीमध्ये वाहनातून १ किलो १९० ग्रॅम वजनाचा गांजा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत २९ हजार ७५० रुपये असून, वाहनाची अंदाजे किंमत ६ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी सविस्तर जप्ती पंचनामा करून एकूण ६ लाख २९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध NDPS Act 1985 अंतर्गत कलम 20(b)(ii) व 22 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली PSI चंदन परिहार, पांडुरंग तूपसुंदर, मुकेश बुधवंत, सिद्धेश्वर चाटे, माणिक डुकरे, राम पोळ, नामदेव डुबे व चालक कश्यप साने यांच्या पथकाने केली.

## मुंबई-बंगळुरू आता अवघ्या साडेपाच तासांत : गडकरींच्या घोषणेमुळे महाराष्ट्राला मोठा फायदा



**पुणे :** मुंबई ते बंगळुरू हा प्रवास आता अवघ्या साडेपाच तासांत पूर्ण करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची माहिती दिली. संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाच्या कामाची पाहणी केल्यानंतर त्यांनी नव्या महामार्गाबाबत घोषणा केली. या मार्गाच्या पहिल्या टप्प्याची निविदा काढण्यात आली असून, पुण्यापर्यंतचे काम तीन टप्प्यांत पूर्ण केले जाणार आहे. पुढे हा मार्ग फलटणमार्गे थेट बंगळुरूपर्यंत जोडला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नितीन गडकरी यांनी सांगितले की, हा महामार्ग मुंबईतील अटल सेतूनंतर सुमारे चार किलोमीटर अंतरावरून सुरू होणार आहे. आतापर्यंत उत्तर भारतातून दक्षिणेकडे जाणाऱ्या वाहनांसाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर किंवा सोलापूर हा मुख्य मार्ग होता. मात्र आता वाहतुकीचा मोठा भाग सुरतमार्गे नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, कर्नूल, चेन्नई, बंगळुरू, मंगळुरू आणि हैदराबादकडे वळवण्यात येणार आहे. या नव्या रस्तेमार्गामुळे चेन्नई ते दिल्लीचे अंतर 320 किलोमीटरने कमी होणार असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच बंगळुरू आणि चेन्नईकडील मोठी वाहतूक सुरतमार्गे वळवल्याने सोलापूर परिसरातील वाहतुकीचा ताण 40 ते 50 टक्क्यांनी कमी होईल, असेही त्यांनी सांगितले.

याशिवाय पुणे ते छत्रपती संभाजीनगर या मार्गालाही मंजुरी मिळाल्याचे गडकरी यांनी जाहीर केले. भविष्यात पुणे ते नागपूर हा प्रवास अवघ्या साडेचार तासांत पूर्ण करता यावा, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. पालखी मार्गामुळे या परिसरातील औद्योगिक आणि व्यापारी विकासाला गती मिळेल, असेही त्यांनी सांगितले. कंटेनर वाहतूक वाढल्याने गोदामे, लॉजिस्टिक पार्क आणि उद्योगधंद्यांना मोठी चालना मिळणार असल्याचे ते म्हणाले. नवी मुंबई विमानतळासाठी जसे आधीच उड्डाणपूल आणि रस्त्यांचे नियोजन करण्यात आले, त्याच धर्तीवर पुरंदर विमानतळासाठीही नियोजन करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

टोल व्यवस्थेबाबतही नितीन गडकरी यांनी महत्त्वाची माहिती दिली. देशातील टोलनाक्यांवरील बॅरिअर हटवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आता वाहन क्रमांक आणि फास्टॅगच्या आधारे थेट बँक खात्यातून टोल वसूल केला जाणार आहे. यामुळे वाहनधारकांचा वेळ वाचेल आणि वाहतूक कोंडी कमी होईल, असे त्यांनी सांगितले. कारचालकांसाठी तीन हजार रुपयांचा वार्षिक पास देण्यात आल्याची माहिती देताना त्यांनी आर्थिक दिलासा मिळेल, असे नमूद केले. मात्र कोणालाही पूर्ण टोलमाफी देणे शक्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


दरम्यान, राज्यातील विविध भागांसाठी अनेक नव्या प्रकल्पांची घोषणाही करण्यात आली. जेजुरी येथे दोन किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलासाठी 250 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. फलटण शहरातील रस्ते रुंदीकरणासाठी 97 कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. नीरा रस्त्यावर 72 मीटर लांबीचा रेल्वे ओव्हरब्रिज उभारण्यात येणार आहे. तसेच टेंभुर्णी ते पंढरपूर दरम्यान साडेनऊ किलोमीटर लांबीचा बाह्यवळण मार्ग तयार केला जाणार असून, हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पंढरपूरला पूर्ण रिंगरोडची सुविधा मिळणार आहे. तोंडले गावात दोन्ही पालखी मार्ग जिथे एकत्र येतात त्या ठिकाणी 100 कोटी रुपयांच्या खर्चातून उड्डाणपूल उभारण्याची घोषणाही गडकरी यांनी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १६ मे २०२६


## गरजू व पात्र शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही - कृषी अधिकारी घुगे



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक अडीअडचणी, शंका आणि तांत्रिक मार्गदर्शनासाठी आता भटकंती करावी लागणार नाही. शेतकऱ्यांच्या समस्यांचे जागेवरच निराकरण करण्यासाठी जिंतूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने एक विशेष पाऊल उचलले असून, दररोज कार्यालयात कृषी सेवकांची नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. याबाबतचे अधिकृत आदेश तालुका कृषी अधिकारी एन.जी. घुगे यांनी निर्गमित केले आहेत.तालुक्यातील अनेक शेतकरी मार्गदर्शनासाठी तालुका कार्यालयात चकरा मारतात, मात्र अनेकदा क्षेत्रीय कर्मचारी किंवा अधिकारी गावात दौऱ्यावर असल्याने त्यांची भेट होत नाही. यामुळे शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन होण्यास अडचणी येत होत्या.या बाबीची गंभीर दखल घेत तालुका कृषी कार्यालयाने आता महिनाभराचे नियोजन जाहीर केले आहे.नवीन आदेशानुसार, दर महिन्याच्या १ ते ३१ तारखेपर्यंत प्रत्येक दिवसासाठी स्वतंत्र कृषी सेवकाची ड्युटी लावण्यात आली आहे. हे नियुक्त कर्मचारी कार्यालयीन वेळेत पूर्ण दिवस जिंतूर येथील कार्यालयात हजर राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील. शासकीय सुट्टीचे दिवस वगळता हे कामकाज नियमितपणे सुरू राहणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना नेमक्या कोणत्या दिवशी कोणता कर्मचारी उपलब्ध असेल, याची स्पष्ट माहिती मिळणार आहे.तालुका कृषी अधिकारी एन.जी. घुगे यांनी या आदेशात स्पष्ट केले आहे की, जर नियुक्त कर्मचाऱ्याने या आदेशाचे उल्लंघन केले किंवा कामात दुर्लक्ष केले, तर त्याला जबाबदार धरून संबंधित कर्मचाऱ्यावर कडक प्रशासकीय कारवाई केली जाईल. या नवीन व्यवस्थेमुळे जिंतूर तालुक्यातील शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांच्या कृषी विषयक तक्रारींचे निवारण जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाचा तुळजापुर येथील कँपमध्ये डंका



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री तुळजा भवानी सैनिकी शाळा, तुळजापुर येथे सीएटीसी 204 कँप दि.05 ते 14 मे 2026 रोजी वार्षिक शिबिर संपन्न झाले. 53 महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्यावतीने या कँपचे आयोजन करण्यात आले होते.कमान अधिकारी कर्नल संतोष नवगण यांच्या मार्गदर्शनाखाली हा कँप पार पडला. कॅडेटसना सैनिकी प्रशिक्षण देण्यात आले.यामध्ये चरित्र, नेतृत्व, देशभक्ती, शिस्त, एकता, अनुशासन, ड्रिल, कवायत, खेळ, फायरिंग,फ्लॅग एरिया, टेंट पिचिंग, ऑब्स्टिकल, मॅप रिडींग, व्यक्तिमत्व विकास, सांस्कृतिक कार्यक्रम आदीचे प्रशिक्षण देण्यात आले. या कँप मध्ये शिवाजी महाविद्यालयातील कॅडेटसनी घवघवित यश संपादन केले या कॅडेसट्ना कर्नल संतोष नवगण व कर्नल वाय बी सिंह यांनी प्रमाणपत्र, पदक देऊन त्यांचा सन्मान केला.मुलींमध्ये बेस्ट फायरर वैष्णवी कांबळे पायलटिंग व ड्रिल, उत्कृष्ट खेळाडु प्रज्वल काळे ड्रिल व गार्ड ऑफ ऑनर,पायलटिंग रंजना भोसले व गायन,ड्रिल मध्ये सागर परीट, राम ममाळे व फायरिंग,पंकज जमादार ड्रिल, फायरिंग व गार्ड ऑफ ऑनर,तसेच थल सैनिक कँप ऑब्स्टिकल मध्ये अमित भोसले,राधा ममाळे,सानिया शेख व ड्रिल तसेच टेंट पिचिंग मध्ये रोहित जमादार,दिव्या लाळे ,प्रदुम्न साळुंके व गायन, तबला, ढोलकी वादन विशाल बरकंबे या सर्व कॅडेटसनी वेगवेगळ्या क्षेत्रात घवघवित यश संपादन करून महाविद्यालयाचा दबदबा कायम राखला.

या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे सर्व संचालक मंडळ प्राचार्य डॉ संजय अस्वले, डॉ पदमाकर पिटले एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, प्रा गुंडाबापू मोरे, शैलेश महामुनी, राजकुमार सोनवणे, नितीन कोराळे व सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका,शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील कँपसाठी शुभेच्छा दिल्या.

## हिंगोली राज्य राखीव दलाच्या समादेशकपदी स्वाती भोर यांची नियुक्ती



**हिंगोली :** हिंगोलीच्या राज्य राखीव दलाच्या समादेशकपदी छत्रपती संभाजीनगर येथील लोहमार्गाच्या पोलिस अधिक्षक स्वाती भोर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बाबतचे आदेश राज्याच्या गृह विभागाने शुक्रवारी ता. १५ काढले आहेत.

हिंगोली येथील राज्य राखी दलाचे समादेशक पद मागील सुमारे पाच महिन्यापासून रिक्त होते. तत्कालीन समादेशक पोर्णिमा गायकवाड यांच्या बदली नंतर हे पद रिक्त झाले होते. त्यानंतर हिंगोलीच्या समादेशक पदाचा पदभार छत्रपती संभाजी नगर येथील राखीव दलाचे समादेशक विक्रम साळवी यांच्याकडे काही दिवस सोपविण्यात आला होता. तर काही दिवस येथील पदभार जालना येथील राज्य राखीव दलाच्या समादेशक उज्वला बनकर यांच्याकडे देखील सोपविण्यात आला होता. मात्र कायमस्वरूपी समादेशक नसल्यामुळे मोठी अडचण होऊ लागली होती. राखीव दलातील वसाहती मधील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासोबतच जवानांचे कार्यालयीन कामे प्रलंबित राहात होती.

दरम्यान शासनाच्या गृह विभागाने आज वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढले आहेत. यामध्ये हिंगोलीच्या राज्य राखीव दलाच्या समादेशकपदी छत्रपती संभाजीनगर येथील लोहमार्ग विभागाच्या पोलीस अधीक्षक स्वाती भोर यांची नियुक्ती केली आहे. मागील सुमारे पाच महिन्यापासून रिक्त असलेले पद भरण्यात आल्यामुळे आता राज्य राखीव दलाच्या गटातील महत्वाचे प्रश्न तसेच जवानांच्या कार्यालय कामकाजाचे प्रश्न मार्गी लागणार आहे.

दरम्यान पोलीस अधीक्षक स्वाती भोर यांनी यापूर्वी संगमनेर येथे पोलीस उपाधीक्षक म्हणून तर त्यानंतर श्रीरामपूर येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून काम पाहिले. अत्यंत कडक शिस्तीच्या अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे हिंगोलीच्या राज्य राखीव दलाला नवे बळ मिळणार आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १६ मे २०२६


## बंडूनाना

आमचे बंडूनाना
अगदी ढेरपोटे
जेवतांना खातात
लाडू मोठे मोठे

यथेच्छ जेवल्यावर
लागते त्यांना डुलकी
जणू पुराणातल्या
कुंभकर्णासारखी

आमचे बंडूनाना
खूपच विसरभोळे
काही विसरले तरी
मुळीच नाही कळे

दिमाखात छत्री नेतात
जातांना बाजारी
लगबगीने येतात
छत्री विसरून घरी

आमचे बंडूनाना
मारतात भारी थापा
एका घासात म्हणे
कलिंगड खातो गपागपा




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## पुन्हा नवी सुरुवात

जीवनात जगतांना
खूप संकटे येतात
वेळोवेळी क्षमतांचा
सदा परीक्षा घेतात. १

स्वत: जागृत राहून
संकटांना पळवावे
लढा त्वेषाने देऊन
यश पुन्हा मिळवावे. २

पुन्हा नवी सुरुवात
सदा जोमाने करावे
संकटांशी लढतांना
मनी उत्साह भरावे. ३

काय तुझे काय माझे
सारे इथेच राहते
संकटाला जिंकताना
हर्ष आनंद वाहते. ४

अपमान विसरूनी
सदा आनंदी जगावे
जिंकताना संकटांना
सदा सतर्क रहावे. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेची घोषणा
## महाराष्ट्रातील ९.८६ कोटी मतदारांची पडताळणी होणार

**बीड (भगवंत पाळवदे) :** भारतीय निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण - तिसरा टप्पा' (SIR Phase-III) राबवण्याचे अधिकृत आदेश दिले आहेत. या महत्त्वाकांक्षी मोहिमेत महाराष्ट्राचा प्रामुख्याने समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ६४ हजार ४१३ मतदारांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत. चालू असलेल्या जनगणनेच्या 'हाऊस लिस्टिंग' प्रक्रियेचा विचार करून आयोगाने हे वेळापत्रक आखले असून, हवामानाची प्रतिकूलता लक्षात घेता केवळ हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि लडाख या भागांना या टप्प्यातून वगळण्यात आले आहे.महाराष्ट्रातील या मोहिमेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून एकूण ९७,९२४ बूथ लेव्हल ऑफिसर्स (BLO) घरोघरी जाऊन मतदारांच्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांच्या ९६,९४९ बूथ लेव्हल एजंट्सची (BLA) मदत घेतली जाणार आहे.आयोगाच्या वेळापत्रकानुसार, २० जून ते २९ जून २०२६ या काळात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण होईल, त्यानंतर ३० जूनपासून प्रत्यक्ष घरोघरी भेटी देऊन पडताळणी करण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. ही मोहीम २९ जुलैपर्यंत चालेल.राज्यातील मतदारांसाठी ५ ऑगस्ट २०२६ ही तारीख महत्त्वाची ठरणार आहे, कारण याच दिवशी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांना आपल्या नावातील दुरुस्ती, पत्ता बदल किंवा नवीन नाव नोंदणीसाठी दावे आणि हरकती सादर करता येतील. सर्व हरकतींचा निपटारा केल्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्राची अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे.निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि सर्वसमावेशक होईल. या मोहिमेमुळे आगामी निवडणुकांसाठी राज्याकडे एक त्रुटी मुक्त आणि अद्ययावत मतदार डेटाबेस उपलब्ध होणार आहे. पहिल्या दोन टप्प्यांत देशातील ५९ कोटी मतदारांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि पंजाब यांसारख्या मोठ्या राज्यांमध्ये कामाला वेग येणार आहे

## खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मधुमित्र-मधुसखी पुरस्कार जाहीर

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने दिले जाणारे 2026 सालचे 'मधुमित्र' व 'मधु-सखी' पुरस्कार लातूरचे ज्ञानेश्वर मलीले, छत्रपती संभाजीनगरचे गणेश बुरकुल, बुलढाण्याचे राजेंद्रदास बैरागी आणि पुण्याच्या श्वेता वायाळ यांना जाहिर झाले आहेत. याशिवाय निवड समितीने ठाण्याचे चंद्रकांत तरे, पुण्याचे संजय मारणे, कोल्हापूरचे दयावान पाटील आणि जळगावचे विद्यानंद आहिरे यांची विशेष सन्मानासाठी निवड केली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती (राज्यमंत्री दर्जा) रवींद्र साठे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या 'मधाचे गाव' तसेच जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने योजलेला 'मधु मित्र – मधु सखी पुरस्कार' तसेच मंडळाच्या विविध कार्याविषयीची सभापती साठे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे पत्रकार परिषदेतून माहिती दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील उपस्थित होते.

'मधु मित्र' आणि 'मधु सखी' पुरस्काराचे वितरण 20 मे 2026 या जागतिक मधमाशी दिनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात होणार असल्याचे सांगून सभापती साठे म्हणाले की, महाराष्ट्रातील मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने 2023 पासून ही पुरस्कार योजना सुरू केली आहे. या पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कमेचा समावेश आहे.

राज्यात मधमाशीपालनास प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाच्या मध संचालनालयामार्फत प्रशिक्षण, जनजागृती मेळावे, मध महोत्सव, 'मधाचे गाव' योजना तसेच मधुमित्र-मधुसखी पुरस्कार असे विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले. 'मधाचे गाव' योजनेसाठी राज्य शासनाने 17 कोटी रुपयांची तरतूद केली असून पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांतील दहा गावांमध्ये काम सुरू झाले आहे. गेल्या दोन महिन्यांत 348 मधपाळांना प्रशिक्षण देण्यात आले असून 1750 मधपेट्या, संरक्षण पोशाख, मध यंत्र आणि अन्य साहित्याचे वितरण करण्यात आले आहे.

या योजनेमुळे निसर्ग संवर्धन, मध उत्पादनवाढ, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार असल्याचा विश्वास साठे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ गेली 65 वर्षे कार्यरत असून पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजना आणि मध केंद्र योजना यांची अंमलबजावणी मंडळामार्फत केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी उत्पादनांच्या वापराचे केलेले आवाहन लक्षात घेऊन मंडळाने "हर घर खादी, घर घर खादी" ही मोहीम सुरू केली असल्याचेही सभापती साठे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील उद्योजकांनी तयार केलेली खादी वस्त्रे, हातकागदापासून बनविलेल्या वस्तू, गणेशमूर्ती तसेच मधापासून तयार होणारी सौंदर्यप्रसाधने नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करावीत, असे आवाहन सभापती साठे यांनी केले.

राज्यात पारंपरिक मध उत्पादनाला चालना देण्यासाठी शासनाने 12 मधगावांना मान्यता दिली असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातील घोलवड, नांदेड जिल्ह्यातील भंडारवाडी, नंदुरबार जिल्ह्यातील बोरझर, हिंगोली जिल्ह्यातील काकडदाभा, नाशिक जिल्ह्यातील चाकोरे, अहिल्यानगर जिल्ह्यातील उडदावणे, परभणी जिल्ह्यातील शेलमोहा, वर्धा जिल्ह्यातील सिंधीविहीर, सातारा जिल्ह्यातील सालोशी, अमरावती जिल्ह्यातील आमझरी, धुळे जिल्ह्यातील रामी आणि रत्नागिरी जिल्ह्यातील तळवडे या गावांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मध उत्पादकांना बाजारपेठ, प्रशिक्षण व आर्थिक सक्षमीकरणाची संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती सभापती साठे यांनी यावेळी दिली.

पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत महाराष्ट्रात एकूण 27,529 ऑनबोर्डेड ग्रामपंचायतींतील प्रशिक्षणासाठी नोंदणीकृत 2,45,026 लाभार्थी असून कर्ज वितरण आर्थिक लाभार्थ्यांची संख्या 53,593 असल्याचे सांगत सभापती साठे यांनी 2025-26 या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत राज्यात 5,791 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती दिली. यासाठी 9723.18 लाख रूपयांचे मार्जिन मनी मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत 1,078 प्रकल्पांसाठी 2021.98 लाख रूपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असून या माध्यमातून 8,624 रोजगार निर्मिती झाली आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत महाराष्ट्रात 1,625 प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून 5947.5लाख रुपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १६ मे २०२६


# अक्षरांच्या वाटेवर : काळोखातून प्रकाशाकडे नेणारा प्रवास




**मा**झ्या आयुष्याची सुरुवात काळोखात झाली. घरात वाचन-लेखनाची परंपरा नव्हती. गावात वर्तमानपत्र येत नव्हते. अज्ञानाचा, अंधाराचा तो काळ होता. पण त्याच काळोखात मला अक्षरांचा पहिला प्रकाश दिसला.मी अक्षरांच्या नादी लागलो. किराणा दुकानातल्या रद्दीतल्या पुरवण्या वेचून आणायचो. दै. 'लोकमत', 'बालमित्र', 'साप्ताहिक सकाळ'च्या त्या जुन्या पानांतून माझ्यासाठी ज्ञानाचा पहिला दिवा पेटला. शेताच्या बांधावर बसून तो उजेड मी ओंजळीत झेलायचो. यात आमचे देशगव्हाण येथील गावाजवळील सौंदडीचे शेत हीच माझी अभ्यासिका विद्यार्थीदशेत होती. तिथे तासनतास मी वाचन करायचो. चिंचेच्या झाडावर बसूनही वाचन करायचो.पेपर वाचण्यासाठी मी वाकुळणी गावात ३ कि.मी. पायी जायचो. शहरात गेलो की दोन-तीन पेपर घ्यायचो. अक्षरांनी मला काळोखातून बाहेर काढले. वाचता-वाचता बोलते केले आणि नंतर लिहितेही केले.हाच दिवा मला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ग्रंथालयापर्यंत घेऊन गेला. तिथे अक्षरांचे आभाळच लवंडले होते. नोकरीला लागल्यावर 'आठवणीचे पक्षी', 'कृष्णाकाठ', 'अंगारमळा', 'शिवार ते संसद' या पुस्तकांनी जगण्याला दिशा दिली. ग्रामीण, दलित, आदिवासी साहित्याने समाजाचा अंधार दाखवला आणि त्या अंधाराशी लढण्याचे बळ दिले.

शाळेतल्या मराठीच्या पुस्तकाने लावलेली ज्योत मला मराठीचा प्राध्यापक करून गेली. हायस्कूलचे शिक्षण घेत असताना छत्रपती संभाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक वसंतराव नलावडे, मराठीचे शिक्षक श्री. ढवळे सर यांनी वाचनाची गोडी लावली. पुस्तके वाचावयास दिली. आता अनेक पुस्तकांची दुकाने आणि वाचनालये यांच्याशी मी जोडलेलो आहे. त्यात डॉ. बा. आं. म. विद्यापीठाचे ग्रंथालय, बलवंत वाचनालय, शासकीय विभागीय ग्रंथालय, सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय कन्नड, शिवाजी महाविद्यालय कन्नडचे ग्रंथालय त्याचबरोबर साकेत बुक वर्ल्ड, कैलाश पब्लिकेशन्स, स्वरूप प्रकाशन, एज्युकेशनल पब्लिकेशन्स, आदित्य प्रकाशन, रजत प्रकाशन, राजहंस प्रकाशन, विद्या बुक्स, सिडको कॅनॉट येथील गुरु एजन्सी, गाव प्रकाशन, सौरव प्रकाशन तसेच बाहेरचीही अनेक प्रकाशने व ग्रंथालये आहेत. आमच्या शिवाजी महाविद्यालयात एक वर्ष अतिरिक्त कार्यभार म्हणून ग्रंथपाल सेवा निवृत्त झाल्यावर मला ग्रंथपाल म्हणून संधी दिली. हा या अक्षर वाटेवरील मी माझा सन्मान समजतो. आज मी अनेकांना वाचनासाठी प्रेरित करतो. त्यांना पुस्तके भेट देतो.या वाटेवर मला अनेक वाटाडे भेटले. विचारांचे सूर्य म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी दिशा दिली. भक्तीच्या मार्गावर संत तुकाराम व इतर संत भेटले. दहावीला असताना संत तुकारामांच्या गाथेची पारायणे केली. विद्रोहाचा आवाज म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, अण्णाभाऊ साठे, वामनदादा कर्डक यांचे शब्द ऐकले. मातीचा सुगंध म्हणून बहिणाबाई चौधरी, ना. धो. महानोर, विठ्ठल वाघ, शंकर बडे, श्रीकांत देशमुख, इंद्रजित भालेराव यांची कविता भेटली. कवितेचे क्षितिज म्हणून केशवसुत, कुसुमाग्रज, बा. सी. मर्ढेकर, बी. रघुनाथ, बा. भ. बोरकर, नामदेव ढसाळ, व्यंकटेश माडगुळकर, अनिल अवचट यांना वाचले.अक्षरवाट समृद्ध करणारे म्हणून रा. रं. बोराडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, फ. मुं. शिंदे, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. एस. एम. कानडजे,डॉ. अंबादास सगट, यांचे मार्गदर्शन लाभले. ज्येष्ठ व समकालीन साहित्यिकांत भास्कर चंदनशिव, अनुराधा पाटील, शेषराव मोहिते, बाबाराव मुसळे, दासू वैद्य, प्रतिभा अहिरे, केशव देशमुख, रमेश चिल्ले, मनोज बोरगावकर, कैलास दौंड, पी. विठ्ठल, ललित अधाने, रमेश रावळकर, श्रीराम गव्हाणे, संतोष आळंजकर व इतर अनेक आहेत. समाजभान देणारे म्हणून बाबा आमटे तसेच शरद जोशी यांनी शेतकऱ्यांची वेदना मांडली. हिंदीतले कवी धूमिल यांनी व्यवस्थेला प्रश्न विचारले. प्रत्येकाच्या अक्षरातून मी थोडा थोडा घडत गेलो.आजही मी रोज किमान दोन ते चार तास वाचन करतो. पहाट असो वा मध्यरात्र, पुस्तक हातात असलेच पाहिजे. प्रवासात बॅगेत पुस्तक नसेल तर प्रवास अपूर्ण वाटतो. वाचन हा आता छंद नाही, श्वास झाला आहे. घरात हजारो ग्रंथ आहेत. 'मार्मिक', 'चित्रलेखा', 'सकाळ साप्ताहिक', 'लोकराज्य', 'यशमंथन', 'किशोर' आणि अनेक दिवाळी अंक, विशेषांक मी जपले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'राजगृह' हे माझे प्रेरणास्थान आहे. घर हीच अभ्यासिका, घर हेच वाचनालय झाले पाहिजे. पुस्तकाशिवाय आपले अस्तित्व शून्य आहे.पुस्तकांनी मला प्राध्यापक केले, लेखक केले. वाचक केले, संपादक केले. हे पुस्तकांचे माझ्यावर अनंत ऋण आहे. पुस्तके आयुष्यात आली नसती तर मी कुठे असतो? आज जे काही आहे ते सारे पुस्तकांचे आहे. पुस्तकांनी मस्तक तर घडलेच पण आयुष्याला दिशा दिली, आकार दिला. आणि जगणं अधिक सुंदर व समृद्ध झाले. पुस्तके जीवनात असणं ही मोठी गोष्ट आहे. मी सगळयात जास्त कुठे रमतो तर पुस्तकाच्या जगात. जगण्याची अनेक उत्तरे मला तिथेच सापडतात. मी आजही गावाकडे गेलो की लोकांना पुस्तके भेट देतो. त्यामुळे आवर्जून लोक मला भेटतात.पण आज समाज पुन्हा काळोखाकडे चालला आहे. मोबाईलच्या निळ्या उजेडात पुस्तकाचा पिवळा दिवा विझत चालला आहे. घरात टीव्ही आहे, फ्रीज आहे, पण ग्रंथकपाट नाही. मुले 'रील' पाहतात, 'ओळ' वाचत नाहीत. वाचन थांबले की विचार थांबतो आणि अंधार पसरतो. मराठी विषयात या वर्षी १०वी मध्ये ९४ हजार विद्यार्थी नापास झाले, ही चिंताजनक बाब आहे. शालेय पातळीवरच लेखन-वाचनाचे संस्कार होऊन वाचनाची गोडी लागली पाहिजे.हा काळोख दूर करून पुन्हा प्रकाशाकडे जायचे असेल तर अक्षरांची वाट धरावीच लागेल. त्यासाठी कुटुंबाने रोज अर्धा तास टीव्ही बंद करून सगळ्यांनी एकत्र वाचावे. पुस्तकावर चर्चा करावी. सत्काराला फुले सुकतात, म्हणून बुके ऐवजी बुक भेट द्यावे. पुस्तक विचार देते. दरवर्षी किमान दोन-तीन दिवाळी अंक घ्यावेत. त्याने वर्षभराची शिदोरी मिळते. वाचनालयाचे सदस्य व्हावे. सुट्टीच्या दिवशी पारावर, बागेत एकत्र वाचावे. गावोगावी वाचन कट्टे सुरू करावेत. पुस्तक प्रदर्शन, संमेलनाला मुलांना आवर्जून घेऊन जावे. यात्रेत, शाळेत, कॉलनीत, सप्ताहात पुस्तक प्रदर्शन व ग्रंथालय सुरू करावे.हाच काळोखातून प्रकाशाकडचा प्रवास सर्वांना घडावा म्हणून मी 'तिफण वाचक चळवळ' चालवतो. तिफण म्हणजे पेरणीचे साधन. आम्ही अक्षरांचे बी गावोगावी पेरतो. पुस्तके भेट देतो. कॉलेजची वाचनालये, सार्वजनिक ग्रंथालये आणि गरजू विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देतो. वाढदिवसाला पुस्तके भेट देतो. लेखक-वाचक मेळावा, वाचन कट्टा चालवतो. कारण एकट्याचा दिवा पुरत नाही, गावाने पेटले पाहिजे.मी अक्षरांच्या नादी लागलो आणि काळोखातून प्रकाशाकडे आलो. त्या वाटेवर चालून जगणं सुंदर झालं, अर्थपूर्ण झालं. देवळात माणूस काहीतरी मागतो, ग्रंथालयात माणूस घडतो. म्हणून घराघरात पुस्तकांचे कपाट हवे, गल्लीगल्लीत वाचन कट्टा हवा, गावोगावी ज्ञानमंदिरे उभी राहिली पाहिजेत.काळोखाला भिऊ नका, पुस्तकाचा दिवा हाती घ्या. कारण पुस्तक वाचाल तर वाचाल. वाचाल तर घडाल. आणि घडाल तर जग उजळवाल. चला तर मग, पुस्तकांची संगत करूया. या अक्षर वाटेवर चालूया.

**- प्रा. डॉ. शिवाजी हुसे**


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी /१२ वी पास
SANITARY HEALTH INSPECATOR — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी /१२ वी पास
PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : Any B.Sc.
C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास
रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
DIALYSIS TECHNICIAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी / १२ वी पास
O.T.TECHINICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास



ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं.१ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com